RNI no: MAHMAR / 2004 / 13776 ✸ Postal Registration No: MH / MR / NW-35 / 2014-2016

अजायब ✵ बानी

मराठी मासिक पत्रिका

वर्ष : अकरा | अंक : नववा | मार्च २०१४

प्रार्थना (सत्संग : परमसंत अजायब सिंह महाराजजी) 5

प्रश्नोत्तरे (प्रेमींच्या प्रश्नांची उत्तरे) 17

धन्य अजायब (दिल्ली शहरातील कार्यक्रमाची माहिती) 34

मालक मुद्रक व प्रकाशक श्री दामोदर सिनकर व श्रीमती रेवती सिनकर यांनी अजायब बानी हे मराठी मासिक नवरंग ऑफसेट १२५, वडाला उद्योग भवन, मुंबई – ४०००३१ येथे छापून सी/५०३ म्हात्रे प्लाझा, महात्मा गांधी रोड, डहाणूकर वाडी, कांदिवली (पश्चिम), मुंबई – ४०००६७ फोन नं: (०२२) २४९६५००० येथून प्रसिद्ध केले.



प्रार्थना

सत्संग : परम संत अजायब सिंहजी महाराज
कबीर साहेबांची वाणी – सॅनबॉर्न्टन, अमेरीका – २५ जुलै १९९६

परमपिता परमात्मा सावन–कृपालजींच्या चरणी नमस्कार असो, ज्यांनी माझ्या या गरीब आत्म्यावर कृपादृष्टी केली व त्यांचा गुणानुवाद करण्याची संधी दिली. सर्वव्यापी व शब्दरुपी परमपिता कृपालजींच्या चरणी माझी सदैव, जेव्हा ते शरीररुपात भेटले नव्हते तेव्हा सुद्धा हिच विनंती व **प्रार्थना** होती की,''हे महान सतगुरु, ज्यांना परमात्मारुप म्हटले जाते, सर्वांचा तारणहारा म्हणून संबोधले जाते, जर तुम्ही कोठे असाल तर मला येऊन भेटा. माझा या जगातील कोणत्याही कर्मा–धर्मावर विश्वास राहिलेला नाही. हे परमात्मा कृपाल, तुम्ही मला त्या नामाचे दान द्या, जे पापींना पुण्यवान बनविते, पापींना तारते व जे विश्वातील कणा–कणामध्ये व्यापक आहे.''

विनंती व **प्रार्थनेत** अत्यंत प्रबळ शक्ती असते. शिष्याने जर खऱ्या अंत:करणापासून त्याच्या सतगुरुंचा धावा केला, सतगुरूंना **प्रार्थना** केली, तर परमात्म्याच्या दरबारामध्ये वास करीत असलेले त्याचे सतगुरू, त्याची ती **प्रार्थना** जरूर ऐकतात. परंतु ती **प्रार्थना** व ती विनंती शिष्याने अत्यंत आर्ततेने व अंत:करणापासून केली असली पाहिजे. त्या **प्रार्थनेत** शिष्याने सतगुरूंकडून सतगुरूंचीच मागणी करावयास हवी. त्याशिष्याच्या अंतरात मी–मोठेपणा तसेच अहंकराचा लवलेशही नसावा. अशी **प्रार्थना** सतगुरू नक्कीच ऐकतात, कारण ती **प्रार्थना** अंतरात्म्यातून निघालेली असते.

खरा शिष्य कधीही स्वत:च्या धन–संपत्तीचा, ज्ञानाचा व गुण–कौशल्याचा अभिमान करीत नाही. तो स्वत:मध्ये दीनता व नम्रता धरण करुन आपल्या सतगुरूंसमोर नतमस्तक रहातो, त्यांच्या दासांचा दास बनून राहतो.

सतगुरूंचा खरा शिष्य कधीही स्वत:च्या सदगुणांकडे लक्ष देत नाही व त्या सदगुणांचा इतरांसमोर दिखाऊपणा करीत नाही, उलट तो स्वत:च्या अवगुणांकडे लक्ष देतो. अशा शिष्याचा दृष्टीकोनच बदलून जातो. तो इतरांच्या

दोषांकडे लक्ष न देता, स्वत:च्या दोषांकडे लक्ष देतो, ते दोष दूर करण्यासाठी आपल्या सतगुरूंसमोर अंत:करणापासून प्रार्थना करतो, मदत मागतो.

ज्याप्रमाणे एखादा रुग्ण आपल्या स्वास्थ्यासाठी डॉक्टरांना विनवणी करतो, त्याचप्रमाणे खरा शिष्य त्याच्या सतगुरूंसमोर **प्रार्थना** करतो की, ''मी पापी आहे व तुम्ही पापनाशक आहात, मी अवगुणांनी भरलेलो आहे व तुम्ही अवगुण माफ करणारे आहात, मी बंधनांमध्ये बंदी झालेलो आहे व तुम्ही बंधने तोडून बंधनमुक्त करणारे आहात. हे प्रिय सतगुरू! आम्ही जर डोंगरांएवढी पापं जमा केली नसती, तर तुम्ही कोणाची पापं माफ केली असतीत! तुम्हास माफीकर्ता असे कोण म्हणाले असते?''

खरा शिष्य सदैव आपल्या सतगुरूंसमोर विनम्रता आणि दीनता धरण करुन उभा रहातो, त्यास माहित असते की त्याचे सतगुरू कर्ते-करविते, सामर्थ्यवान तसेच दीनांवर दया करणारे दीनदयाळू आहेत. म्हणूनच शिष्य म्हणतो, ''तुम्ही दीनांवर दया करणारे दीनदयाळू आहात, तर माझ्याएवढा दीन या जगात दुसरा कोण आहे?'' तुमच्यासमोर कबीर साहेबांची एक लघुवाणी सादर केली जात आहे, ती लक्षपूर्वक ऐकण्याजोगी आहे :

प्रीत लगी तुम नाम की, पल बिसरै नाहीं।।

विरहाने व्याकुळ झालेल्या आत्म्याची प्रतिमा कबीर साहेब अतिशय प्रेमाने आपल्यासमोर मांडत आहेत की, ''एखाद्या स्त्रीचे पुरुषावर व पुरुषाचे स्त्रीवर प्रेम जडल्यास जोपर्यंत त्यांची एकमेकांशी भेट होत नाही, तोपर्यंत ते तना-मनाने तळमळत असतात. ते जेव्हा एकमेकांना भेटतात व त्या दोघांची नजरानजर होते, तेव्हाच त्यांच्या तना-मनामध्ये शांती निर्माण होते.

जर संसारिक प्रेमात प्रेमींची अशी अवस्था होते, खरेतर संसारिक प्रेमात लाभणारी शांती व तृप्ती केवळ तात्पुरती असते व नंतर दुप्पट अग्नी प्रज्वलित होतो. म्हणूनच संसारिक प्रेमामध्ये आजपर्यंत ना कोणास शांती प्राप्त झाली आहे, ना ती कधी प्राप्त होऊ शकेल. अग्नीमध्ये आपण जेवढी जास्त लाकडे टाकू, तेवढा अधिक तो अग्नी प्रज्वलित होतो.

सतगुरू व शिष्याच्या प्रेमामध्ये देखील अशीच तीव्र भावना निर्माण होते. शिष्याच्या अंतरामध्ये जेव्हा त्याच्या सतगुरूंप्रती खरे निर्मळ प्रेम निर्माण होते, तेव्हा जोपर्यंत तो त्याच्या सतगुरूंचे दर्शन घेत नाही, सतगुरुंशी दृष्टादृष्ट होत नाही, तोपर्यंत तो अंतरामध्ये शांती प्रतीत करीत नाही, त्याचे तन-मन विरह अग्नीने तप्त होऊन तळमळत रहाते. त्याचा आत्मा सतगुरूंच्या विरहात आपोआपच अश्रु ढाळू लागतो.

प्रियजनहों! ज्या शिष्यांच्या अंतर्यात सतगुरूंप्रती खरे प्रेम निर्माण झालेले असते, त्यांच्याजवळ बसून कधी तुम्ही त्यांच्या सतगुरूंच्या कथा ऐकून पहा! तुम्ही भलेही रात्रंदिवस त्यांच्याजवळ बसून राहिलात, तरीही त्यांच्या कथा संपत नाहीत, त्यांच्या सतगुरू प्रेमाच्या गोष्टींचा अंत होत नाही. खरेतर ज्या ठिकाणी, ज्या चर्चेमध्ये त्यांच्या सतगुरूंच्या, त्यांच्या जीवलग मित्राच्या गोष्टी होत नसतील, तर त्या सभेत जाणेही ते टाळतात.

गल न करन यार दी जित्थे, ओह सभा दरकार नहीं।

कबीर साहेब आपणांस या वाणीमध्ये एका सच्चा शिष्याच्या हृदयातील प्रेमभावनेचे चित्रण करून सांगत आहेत, त्याच्या अंत:करणातील गुरुप्रेमाच्या व्यथेचे वर्णन करुन सांगत आहेत की शिष्याच्या अंत:करणात गुरुप्रेमाची किती कळ आहे? शिष्य गुरूंसमोर प्रार्थना करीत आहे की, तुम्ही मला जे नाम-सुमिरन दिलेले आहे, त्या नाम-सुमिरनाप्रती माझ्या अंत:करणात एवढे प्रेम व आकर्षण आहे की, तू दिलेल्या नामाचे स्मरण मी जोपर्यंत करीत नाही तोपर्यंत माझे शरीर एखाद्या प्रेतासमान असते, मला रात्री झोप येत नाही व दिवसा चैन पडत नाही. हजरत बाहूदेखील म्हणतात:

राती रत्ती नींद न आवे, देहा बहुत हैरानी हूँ।

जोपर्यंत शिष्य नामस्मरण करीत नाही, तोपर्यंत त्यास चैन पडत नाही. फरीद साहेब त्यांच्या विरहाची पिड़ा अशा रीतीने व्यक्त करतात:

मैं जाणेया दुख मुझको, दुख सवाया जग।
उच्चे चढ़के देखया, ते घर-घर ऐहो अग ।।

मला असे वाटत होते की सतगुरू प्रेमाची वेदना केवळ मलाच होत आहे, परंतु मी जेव्हा इतर प्रेमींना भेटतो, तेव्हा लक्षात येते की, परमात्म्याने ज्यांना हा विरह प्रदान केला आहे, त्या सर्वांची अशीच स्थिती आहे. जेव्हा मी नामस्मरणाद्वारे शरीराची नऊ द्वारे खाली करुन, दोन्ही नेत्रांच्या पाठीमागे तिसऱ्या तिळावर येऊन स्थूल, सूक्ष्म व कारण हे तिनही पडदे आत्म्यावरून दूर सारून परब्रह्मामध्ये पोहोचलो, तेव्हा माझ्या लक्षात आले की, हा विरह–अग्नी सतगुरू घरोघरी जाऊन ज्या आत्म्यांमध्ये प्रज्वलित करतात, त्या आत्म्यांना ना दिवसा चैन पडते, ना रात्री झोप येते.

सतगुरूच शिष्याचा शोध घेतात, तेच शिष्याच्या अंतरात विरहाची बी पेरतात. साप भले कितीही विषारी असो, परंतु गारुडी जेव्हा पुंगी वाजवितो, तेव्हा तो साप त्या पुंगीसमोर मग्न होऊन डोलू लागतो. याचप्रमाणे परमात्मा कृपालजींनी आपल्या अंतरामध्ये विरहाची बी पेरली, तेव्हाच आपण सर्वजण किती दूर–दूरहून येथे एकत्रीत होऊन त्यांच्या आठवणीत बसलो आहोत व त्यांच्या स्मरणात त्यांचे स्तुती–स्तोत्र गात आहोत. आपल्या सर्वांना मिळालेली ही प्रेमाची देणगी व ठेव सतगुरू कृपालजींनीच आपणांस दिलेली आहे.

नजर करो अब मिहर की, मोहिं मिलो गुसाईं।।

शिष्य आता सतगुरूंना प्रार्थना करीत आहे की, तू माझ्यावर कृपेची दृष्टी टाक. माझ्या हृदयात तुझ्या प्रेमाची तहान लागलेली आहे व केवळ तुझ्या प्रेमाचे पाणीच ही तहान भागवू शकेल.

बिरह सतावै मोहिं को, जिव तड़पै मेरा।।

ज्याप्रमाणे तहानेने व्याकुळ झालेला मनुष्य पाण्यासाठी तळमळतो, त्याप्रमाणे माझे हृदय तुझ्या विरह अग्नीमध्ये तळमळत आहे. आपणच पहा! जर प्रेमीच्या अंत:करणात अशी तळमळ निर्माण झाली, तर तो प्रेमी असे बहाणे करील काय की,''मला नामस्मरण करणे जमत नाही,ध्यानात बसल्यास माझे शरीर दुखू लागते.'' असे तो कदापीही करणार नाही कारण त्यास तर तहान लागलेली असते व तहानेने व्याकुळ झालेला मनुष्य पाणी–पाणी असे

उच्चारत राहतो. त्यास जेव्हा पाणी मिळते, तेव्हा ते पाणी हिंदुचे आहे की मुसलमानाचे असे तो विचारत नाही. ते पाणी तो मनुष्य लवकरात लवकर पिऊ इच्छितो. अशीच अवस्था सतगुरू व शिष्याची असते. जेव्हा शिष्याच्या अंत:करणात सतगुरूंप्रती खरे प्रेम व त्यांच्या भेटीची खरी तळमळ निर्माण होते, तेव्हा जोपर्यंत त्याची सतगुरूंशी भेट होत नाही, तोपर्यंत तो रात्रंदिवस तळमळत राहतो. गुरू अर्जुनदेवजी महाराज म्हणतात:

खोजत – खोजत भई वैरागन, प्रभ दर्शन की हौं पिरत तसाई।

तुम देखन की चाव है, प्रभ मिलो सवेरा।।

शिष्य सतगुरूंकडून मान–मरातब, धन–संपत्ती किंवा सत्तेची मागणी करीत नाही. तसेच स्वत:चे आजारपण वा बेरोजगारी दूर करण्याचीही विनंती करीत नाही. तर रात्रंदिवस सतगुरूंकडे तो हीच प्रार्थना करतो की मी केवळ तुमचे दर्शन मागतो, तुम्ही लवकरात लवकर मला दर्शन द्या.

गुरू अर्जुन देवजींच्या इतिहासात ही घटना येते की, त्यांच्या कुटुंबात लाहोर येथे कोणाचा तरी विवाह होता. गुरू रामदासजींना त्या विवाहाचे आमंत्रण मिळाले. त्यांनी आपल्या इतर मुलांना त्या विवाहासाठी जाण्यास सांगितले असता, त्यांनी नकार दिला. त्यांनी गुरू अर्जुन देवजींना विवाहासाठी जाण्यास सांगितले. त्यावेळी गुरू अर्जुन देवजी वयाने लहान होते. गुरू रामदासजींनी गुरू अर्जुन देवजींना विवाहासाठी पाठविताना सांगितले, ''जोपर्यंत मी तुला परत बोलावित नाही, तोपर्यंत तू येऊ नकोस.''

लाहोर व अमृतसरमधील अंतर तीस मैलांचे आहे. गुरू अर्जुन देवजी नेहमी आपल्या घराच्या गच्चीवर उभे राहून पहात असत की ज्या अमृतसर गावात माझे गुरु रहतात, काय इथुन ते अमृतसर नजरेस पडते का? ते त्यांच्या वाणीमधून लिहितात :

एक घड़ी न मिलते ते कलयुग होता, हुण कद मिलिए प्रिय तुध भगवन्ता।
मोहे रैन न विहावे नींद न आवे, बिन देखे गुरु दरबारे जियो।।

एका बाजूने सतगुरूंचा बाहेरुन आदेश होता की,''जोपर्यंत मी तुला परत बोलावित नाही, तोपर्यंत तू येऊ नकोस.'' परंतु दुसऱ्या बाजूस गुरू अर्जुन देवजींच्या अंतरात सतगुरू दर्शनाची तळमळ होती, जर आपली गुरू दर्शनाची तहान भागविण्यास परत गेल्यास गुरु आदेशाचे उल्लंघन होत होते.

गणिती वैज्ञानिकांनी कलियुगाचा चार लाख बत्तीस हजार वर्षे एवढा अवधी सांगितलेला आहे. तर गुरू अर्जुन देवजी महाराज आपल्या सतगुरू विरहाच्या एका क्षणाच्या विरहास कलियुगाएवढा अवधी समजतात. ते म्हणतात, ''रात्र सरत नाही, दिवसा चैन पडत नाही. मला तुमचे दर्शन कधी होईल? मी तुमच्या दर्शनापासून वंचित राहिलेलो आहे.'' गुरू नानक देवजी महाराज सुद्धा सांगतात:

जे इक छिन विछड़े तो जानूं बरस पचासा।

गुरु दर्शनापासून एका क्षणाचा विरह मला पन्नास वर्षांइतका वाटतो. प्रात:काळच्या गुरू मिलनाच्या क्षणास गुरू अर्जुन देवजी महाराज सांगतात, ''हे रात्री, तू तुझा कालावधी वाढव आणि निद्रेस सांगतात, तू कमी हो, कारण दिवस उगवल्यावर माझा सतगुरूंपासून विरह होईल.''

सच्चे पातशाह महाराज सावन सिंहजी उन्हाळ्यामध्ये डलहौसीतील पर्वतांवर आराम करण्यासाठी जात असत. तेथे जाण्यास सर्वांना मनाई असे. त्यामुळे प्रेमी वाट पहात असत की कधी महाराजजी आश्रमात परत येतील व आम्हास दर्शन देतील. एके दिवशी महाराजजी डलहौसीहून आश्रमात परतण्याच्या तयारीत होते, परंतु त्यांनी विचार केला की अजून आश्रम परिसरात गर्मी आहे, म्हणून त्यांनी आणखीन काही दिवस डलहौसी येथील मुक्काम वाढविला.

महाराज कृपालजींच्या हृदयात खरी तळमळ होती. त्यांनी महाराज सावन सिंहजींना तार पाठविली की, तुमच्यासाठी तेथे ऋतु वसंत आहे परंतु आमच्यासाठी येथे अंत आहे. ती तार जेव्हा महाराज सावन सिंहजींना मिळाली तेव्हा त्यांनी तत्काळ परतण्याची तयारी केली.

आश्रमात परतल्यावर ते महाराज कृपालजींना म्हणाले,''हे बघ! अशा रीतीने कठोर शब्दांचा वापर करून तार पाठवू नकोस. तुझ्या हृदयात माझ्या भेटीची जितकी तळमळ आहे, तितकीच तळमळ माझ्याही हृदयात आहे.''

नैना तरसै दरस को, पल पलक न लागै।।

नेत्रांमध्ये सुद्धा सतगुरू दर्शनाची इतकी तळमळ व विरह आहे, की जर मी नेत्र बंद केले असता सतगुरु माझ्या समोर येऊन उभे राहिले तर? म्हणून मी माझ्या नेत्रांना उघडेच ठेवले आहे. कबीर साहेब म्हणतात:

जब तू आवे आँख में, आँख झांप मैं लूं।
न मैं देखूं और को, न तुझे देखन दूं।।

मी माझ्या स्वत:ची विरह वेदना अशी वर्णन केलेली आहे:

नैन ललारी नैन कसुंबा नैन नैना नू रंगदे।
इक नैन नैना दी करन मजूरी ते मेहनत मूल ना मंगदे।।

दर्दवंद दीदार का, निसि बासर जागै।।

आता आपण प्रेमाने सांगता,''ज्यांच्या हृदयात गुरुदर्शनाची उत्कंठा, प्रेम आणि तळमळ असते की कोणत्याही परिस्थितीत मी सतगुरुंचे दर्शन केलेच पाहिजे, त्यांना ना दिवसा चैन पडते व ना रात्री चैन पडते.''

जो अब के प्रीतम मिलैं, करूँ निमिष न न्यारा।।

आत्मा प्रेमाने म्हणते की, ''आता एकदा का सतगुरूंशी मिलन झाले, तर मी त्यांना कधीच दूर जाऊ देणार नाही.'' कारण ज्यांचे सतगुरूंवर खरे प्रेम जडते, त्यांची झोपच उडते, ते सतगुरुंना नजरेआड होऊ देत नाहीत.

गुरूमल सिंह तुम्हांस महाराज सावन सिंहजींच्या वाढदिवसा निमित्त एक भजन ऐकवतील. त्याची पहिली ओळ अशी आहे :

आ कृपाल कोल बैठ असां दे, फोल दिलां दे वरके।
होई कौण खनामी साथों, लंघ जांदों चुप कर के।।

अब कबीर गुरू पाया, मिला प्रान प्यारा।।

आपण प्रेमाने सांगता, सतगुरूंनी सेवकाची विनंती ऐकली. तसेच तिचा स्वीकार देखील केला. कारण सेवकाची विनंती कधी वाया जात नाही. गुरू नानक देवजी महाराज म्हणतात,''सतगुरुंना अंत:करणापासून केवळ सतगुरु भेटीचीच विनंती केली जाते व ती विनंती सतगुरू नक्कीच ऐकतात.''

कबीर साहेब म्हणतात की,''शिष्याने गुरुप्रेमात केलेली सतगुरु मिलनाची विनंती जेव्हा सतगुरू ऐकतात, तेव्हा ते ती मंजूर करतात. त्यांना देखील शांत राहावले जात नाही, ते तत्काळ त्यास दर्शन देतात.''

प्रियजनहो! मी माझ्या जीवनातील अनुभव सांगत असतो की मला महाराज कृपालजींचा ना कोणी निंदक भेटला व ना कोणी प्रशंसक भेटला होता. मला हे देखील माहिती नव्हते की, माझे गुरु दिल्लीत राहणारे आहेत की कलकत्त्यात राहणारे आहेत. खरेतर कृपाल नावाचे कोणी संत आहेत याची देखील मला कल्पना नव्हती. प्रियजनहो! माझ्या अंतर्यातील तळमळीची आर्जव व विनंती ऐकूनच पाचशे किलोमीटर दूरहून ते मला भेटण्यासाठी आले. हा माझा स्वानुभव आहे की परमात्म्याचे प्रियजन अंतर्ज्ञानी असतात. त्यांची प्रेमाने कोण आठवण काढीत आहे, याचे त्यांना संपूर्ण ज्ञान असते. ते त्यास भेटण्यासाठी नक्कीच येतात. म्हणून मी एका भजनात लिहिले आहे.

जद कूक सुणी अजायब दी, गई कलेजा चीर।
आसन छड सच्चखंड दा, आऐ कृपाल अखीर।।

प्रियजनहो, जर सतगुरूंकडे सतगुरूंचीच मागणी केली तर ते आपल्या मागणीची जरूर पूर्ती करतात. गुरू नानक देवजी महाराज म्हणतात:

बिन तुध होर जे मँगना सिर दुखा दे दुख।
दे नाम सन्तोखिया उतरे मन की भुख।।

खरे तर आम्हा अंध व मुर्ख जीवांना हे देखील माहित नसते की आपण सतगुरूंकडे काय मागावे?

पी ले प्याला हो मतवाला, प्याला नाम अमी रस का रे।।

मी अनेकदा सांगत असतो की, जोपर्यंत अश्रु पुसणारा जवळ नसतो तोपर्यंत रडण्याचा आनंद मिळत नाही. प्रियजनहो, जेथे अग्नी प्रज्वलीत होतो, तेथे त्याच्या मदतीस ऑक्सिजन पोहोचतो. तसेच शिष्याच्या अंतर्यात जेव्हा सतगुरू भेटीची तळमळ निर्माण होते, तेव्हा सतगुरू जरूर प्रकट होतात व येऊन आपणांस अंतर्नामाचा प्याला पाजतात, ज्यात शिष्य धुंद होतो. त्या धुंदीत जेव्हा आपला आत्मा मशगुल होतो, तेव्हा आपण या जगाची धुंदी विसरून जातो. गुरू नानक देवजी म्हणतात:

अमृत रस सतगुरू चुवाया, दसवें द्वार प्रकट होए आया।

बालपना सब खेल गंवाया, तरुन भया नारी बस का रे।।

आपण आता प्रेमाने समजावता, आपले बालपण खेळ खेळण्यामध्ये व्यतीत होते, तरुणपण विषय-विकरांमध्ये रममाण होण्यात व्यतीत होते, तर वार्धक्य निरनिराळ्या चिंता करण्यामध्ये व्यतीत होते.

बिरध भया कफ बाय ने घेरा, खाट पड़ा न जाय खिसका रे।।

वार्धक्य आल्यावर अशक्तपणा व आजारामुळे आपण खाटेवर खिळून राहतो. त्यावेळी स्वत:हून ना बसता येते, ना चालता-फिरता येते. परंतु अशा परिस्थितीत देखील नामस्मरण केल्यास, ते सुद्धा कामी येते.

नाभि कँवल बिच है कस्तूरी, जैसे मिरग फिरै बन का रे।।

आपण प्रेमाने सांगता आहात परमात्मा आपल्या अंतर्यात आहे. आपण अंतर्यात जाऊन त्याचा शोध घेतला पाहिजे. परंतु आपली अवस्था त्या कस्तुरीमृगासमान आहे, ज्याच्या नाभीतील कस्तुरीचा संगुध त्यास येत असतो, परंतु तो त्या सुगंधाचा शोध मात्र झाडी-झुडपांमध्ये घेत असतो.

बिन सतगुरु इतना दुख पाया, बैद मिला नहिं इस तन का रे।।

आपण प्रेमाने समजावता, आत्म्यास कधी मृत्युचा तर कधी नवजन्माचा सामना करावा लागतो. कोणासही कल्पना नाही की या जगाची निर्मिती कधी झाली? आपण या जगात आतापर्यंत किती फेऱ्या मारल्या आहेत?

आपण किती वेळा पति वा पत्नी बनलो आहोत? किती वेळा आपण मच्छर तसेच माशांचा जन्म घेतला? आपणांस एवढ्या सर्व योनींमध्ये का बरे फेऱ्या माराव्या लागल्या? कारण आजपर्यंत आपणांस सतगुरू मिळाले नाहीत, नाम प्राप्त झाले नाही. एखाद्या जन्मामध्ये आपणांस सतगुरू व नाम प्राप्त झाले असते, तर आज आपण येथे बसलेलो नसतो.

प्रियजनहो! याच वर्षी जानेवारी महिन्यात घडलेली ही घटना आहे. जानेवारीच्या सुरूवातीला मुंबईत सत्संगाचा कार्यक्रम होता. गुरूमेलच्या आजीने महाराज कृपालजींचे दर्शन घेतले होते, परंतु तिने महाराज सावन सिंहजींचे दर्शन केलेले नव्हते. ती शंभर वर्षाची होती, तिला पक्षघाताचा (अर्धांगवायुचा) झटका आला, त्यामुळे घरातील मंडळी अस्वस्थ होती.

तुम्हास कल्पना आहे की, आपण जीव सुरूवातीपासून 'शब्द–नामाची' जेवढी कदर करावयास हवी, तेवढी कदर करीत नाही, त्यास महत्त्व देत नाही. त्यामुळे अंतसमयी आपल्या अंतरात संसारिक विचार येत राहतात. याचप्रमाणे त्या मातेच्या अंतरात या जगरहाटीचे अनंत विचार येऊ लागले व ती असंबद्ध गोष्टी बोलू लागली. तिला चार मुलगे आहेत. तिची ही

अवस्था पाहून सर्वांच्या हृदयात अस्वस्थता निर्माण झाली की ही आता कोणत्या योनीत जाईल? हीचे काय हाल होतील? ही अशी काय बोलते? तिची चिंताग्रस्त मुले माझ्याकडे आली असता, मी त्यांना म्हणालो की, तुम्ही का काळजी करीत आहात? तुम्ही तिला काहीही बोलू नका. त्यावर ते शांत राहिले. संध्याकाळी त्या मातेस महाराज सावन व कृपालजींचे दर्शन झाले, तेव्हा ती म्हणाली, ''अंगणामध्ये पाण्याचा शिडकाव करा. दरवाजा उघडा महाराजजी आले आहेत.''

आम्हांस मुंबईतील सत्संगाच्या कार्यक्रमास जायचे होते. निर्मल सिंह माझ्या जवळ येऊन विचारू लागला,''आम्ही मुंबईस जावे की जाऊ नये?'' मी म्हणालो,''तू हे मला न विचारता त्या मातेस विचार, महाराजजींनी तिला दर्शन दिले आहे तेव्हा ते कधी घेऊन जातील हे ती स्वत:च सांगेल.'' त्यानुसार तिला विचारले असता ती म्हणाली,''महाराजजींनी अजून तरी काही सांगितले नाही.'' पाच-सहा दिवसांनंतर अजित सिंह मला येऊन सांगू लागला की मातेने आम्हांस सांगितले की,''मी आज जाणार आहे.''

प्रियजनहो! हे एक सत्य आहे की, सतगुरू जर भेटले असतील, तर अंतसमयी आपल्या आत्म्यास नेण्यासाठी ते नक्कीच येतात, त्यामुळे मृत्युनंतर आपण भूत-प्रेत आणि जनावरांप्रमाणे या जगात जन्म-मरणाच्या फेऱ्या मारीत बसत नाही.

प्रियजनहो, वास्तुस्थिती अशी असते की आपण जाणाऱ्या व्यक्तीस शांतीने देहत्याग देखील करू देत नाही. जेव्हा एखाद्या व्यक्तीचा अंतसमय येतो, तेव्हा जसे भजनात लिहिलेले आहे, तसे सर्वजण आपआपली डफली वाजवत राहतात, रडगाणे गात राहतात. पती जात असल्यास पत्नी म्हणते, तू मला कोणाच्या आसऱ्यावर सोडून जात आहेस? पत्नी जात असल्यास पतीदेखील अशाच प्रकारे विलाप करतो. तसेच मुले देखील आपआपले रडगाणे गात असतात. आपण मरणाऱ्यास शांतपणे मरूही देत नाही, शेवटचा श्वासही सोडू देत नाही. खरेतर अशावेळी आपले कर्तव्य असते की एखाद्या नामधारी व्यक्तीच्या अंतसमयी जवळपास जर कोणी बिना नामधारी व्यक्ती असल्यास त्यास थोडे दूर जाण्यास सांगावे आणि मग मृत्यु पावणाऱ्या व्यक्तीस प्रेमाने विचारावे की त्यास नाम आठवते का? जर नाम आठवत नसल्यास त्यास आठवण करुन द्यावी. तसे केल्यास तो काही न बोलता जाणार नाही. तो तुम्हांस नक्कीच सांगेल की सतगुरू आले आहेत व मी त्यांच्या सोबत जात आहे.

माता पिता बंधू सुत तिरिया, संग नहीं कोय जाय सका रे।।

अंतसमयी आपल्या सोबत आई, वडिल, भाऊ, बहिण यांपैकी कोणीही सोबत जात नाही, आपला समाजदेखील आपणांस मदत करू शकत नाही. अशा समयी सतगुरूआपल्या सोबत येणार असतात, आपणांस मदत करणार असतात व त्या दु:खसमयी आपले सहाय्य करणार असतात, अशा सतगुरूंवर आपली प्रित नसते व आपण त्यांना विसरून बसलेलो असतो.

जब लग जीवै गुरु गुण गा ले, धन जोबन है दिन दस का रे।।

हे जे संसारिक मान–मराबत, धन–संपत्ती, तारुण्य आहे, ते ढळणाऱ्या सावलीप्रमाणे आहे. म्हणून जोपर्यंत आपले श्वास चालू आहेत तोपर्यंत सतगुरूंना विसरू नका. गुरू अर्जुन देवजी देखील म्हणतात:

गुरु गुरु गुरु कर मन मोर, गुरु बिना मैं नाहीं होर।
गुरु की टेक रहो दिन–रात, जाकीं कोए न मेटे दात।
गुरु करता गुरु करने जोग गुरु परमेश्वर है भी होग।
कहो नानक प्रभ ऐह जनाई, बिन गुरु मुक्ति न पाइए भाई।।

चौरासी जो उबरा चाहै, छोड़ कामिनी का चस्का रे।।

जर तुम्ही चौऱ्याऐंशी लक्ष योनींच्या फेऱ्यापासून व जन्म–मरणाच्या दु:खापासून स्वत:चा बचाव करू इच्छित असाल तर आपले विचार विषय विकारांपासून दूर करवून, त्यांना शब्द–नामाशी जोडा.

कहैं कबीर सुनो भाई साधो, नख सिख पूर रहा विष का रे।।

कबीर साहेबांनी आपणांस या लहानशा वाणीमध्ये अत्यंत प्रेमाने समजावले की जेव्हा शिष्याच्या अंतरात खरी तळमळ, खरे प्रेम निर्माण होते तेव्हा तो सतगुरूंपुढे कळकळीची विनंती करतो, सतगुरुंकडे सतगुरुंनाच मागतो, त्यांच्या दर्शनासाठी प्रार्थना करतो, तेव्हा शिष्यप्रेमात बांधले गेलेले सतगुरू देखील त्याच्या भेटीसाठी जरूर येतात, कारण सतगुरुंनीच प्रेमाचे बीज शिष्याच्या अंतरात पेरलेले असते. ते नक्कीच येऊन शिष्यास दर्शन देतात. आपले देखील कर्तव्य आहे की आपण आपल्या अंतरात सतगुरूं प्रती खरे प्रेम, त्यांच्या भेटीसाठी खरी तळमळ जागृत करावी, शब्द–नामाची कमाई करावी व आपले जीवन सफल करावे. ***

प्रश्नोत्तरे

परम संत अजायब सिंह महाराजजींनी प्रेमींच्या प्रश्नांची दिलेली उत्तरे,
१६पी.एस.राजस्थान – १२ जानेवारी ८७, २८ फेब्रुवारी ८७ व १ डिसेंबर ८७

एक प्रेमी : बगोटा येथील संतबानी शाळेची प्रगती होण्यासाठी सर्वोत्तम मार्ग कोणता आहे?

बाबाजी : कैंट बिकनलने अमेरीकेतील सॅनबॉर्नटन शहरातील संतबाणी शाळेस खूप यशस्वी केले आहे. कर्मधर्मसंयोगाने कैंट येथे आलेला आहे व तुमच्यामध्ये बसलेला आहे. मी यापूर्वी अनेकदा याविषयी प्रेमींना सल्ला दिला आहे की तुम्ही कैंटकडून सल्ला घ्या. तो तुम्हास सांगेल की शाळा स्थापीत करण्यात कोणकोणत्या अडीअडचणी येतात व त्या कशा दूर कराव्यात. तसेच शाळेच्या प्रगतीसाठी कशाप्रकारच्या साधनांची व सामुग्रींची गरज लागते. हा तुम्हांस सर्व प्रकारची माहिती देईल.

एक प्रेमी : काय एका सत्संगी व्यक्तीने एखाद्या बेसत्संगी व्यक्तीकडून रक्त स्वीकारल्यास काही त्रास होऊ शकतो का? तसेच गरज पडल्यास सत्संगीने एखाद्या बेसत्संगी व्यक्तीस रक्त देणे योग्य आहे का? त्यामुळे त्यास काही अडचण येऊ शकते का?

बाबाजी : आपणांस माहित आहे की कोणत्याही गोष्टीस अडचण तर येते, परंतु अडचणीच्या तुलनेत रक्तदानामुळे आपले शुभकर्म जास्त बनते. जर रक्ताचे दोन थेंब देऊन आपण एखाद्याचा जीव वाचविला, तर त्यास दया करणे म्हणतात. आपण अशी दया करण्यास तोंड चुकवू नये. आपल्या मदतीने जर कोणाचा फायदा होत असेल, तर आपण दया जरूर करावी. यामुळे आपलाही फायदा होतो.

डॉक्टरांना माहित असते की ज्यांचा रक्तगट जुळतो त्यांचेच रक्त देण्यात फायदा असतो व केवळ तसे एकतुके रक्तच ते देतात. तेथे सत्संगी वा बेसत्संगी असा विचार केला जात नाही.

एक प्रेमी : महाराजजी, मी जाणू इच्छितो की काय सरतेशेवटी सर्व आत्म्यांची मुक्ती होईल व ते सर्व सचखंडास जातील? तसेच काल, ब्रम्हा, विष्णू, महेश हे सर्व देवी-देवते सुद्धा सचखंडास परत जातील का?

बाबाजी : सर्वात महत्वाची गोष्ट तर ही आहे की आपणांस स्वत:ची काळजी असणे आवश्यक आहे, सर्वप्रथम आपण स्वत:च्या आत्म्यास मन-इंद्रियांच्या ताब्यातून मुक्त करवून सचखंडात दाखल व्हावे. ज्या देवीदेवतांचा प्रश्नकर्त्याने उल्लेख केला आहे, ते ब्रम्हांडाच्या खालील स्तरावर असून ते वर जातात की नाही हे आपण स्वतःच्या नेत्रांनी पाहू शकतो. सर्वप्रथम स्वत:चा विचार करावा. अगोदर आपल्या अंतरातील अग्नी विझवावा, मगच इतरांचा विचार करावा. संतमतामध्ये हीच शिकवण दिली जाते की:

पहले मन परबोधे अपना, पीछे अवर रिझावे।

एक प्रेमी : साधारण दीड वर्षांपूर्वी माझ्या वडिलांचा मृत्यू झाला. ते नामधारी होते. शरीर सोडण्याच्या काही दिवसांपूर्वी त्यांनी आम्हांस सांगितले की जी काही औषधे व अन्न-पाणी आम्ही त्यांस देत होतो, ती बंद करावीत. त्यांच्या सांगण्याचा आदर ठेवून आम्ही जे काही त्यांना औषधे-अन्न-पाणी देत होतो, ते सर्व थांबविले व त्याच्या दोन दिवसानंतर त्यांनी अतिशय शांततेने आपले शरीर सोडले. आता आमचा प्रश्न हा आहे की, जर सत्संगी व्यक्तींनी मृत्यूच्या समीप असताना, औषधे व अन्न-पाणी घेण्यास मनाई केली तर त्यावेळी आम्ही काय करावे? जर एखाद्या बेसत्संगीने अशा परिस्थितीमध्ये अशीच विनंती केल्यास आम्ही काय करावे? आम्ही त्यांचे म्हणणे टाळून त्यांचे औषध-पाणी पुढे चालूच ठेवावे, ज्यायोगे काही काळाकरता का होईना, त्यांचे आयुष्यमान वाढेल? की त्या व्यक्तीच्या इच्छेची कदर करीत, त्यांनी सांगितल्याप्रमाणे आम्ही करावे?

बाबाजी : काही महिन्यांपूर्वीच जुडिथ पर्किन्सच्या आईने शरीर सोडले. डॉक्टरांमुळे जुडिथने आपल्या आईचा अत्यंत दुःखमय स्थितीत झालेला अंत पाहिला. जुडिथने पत्राद्वारे तसेच वैयक्तिक मुलाखतीमध्ये देखील मला विनंती

केली की, मी प्रत्येक सत्संगीस असा सल्ला द्यावा की प्रत्येकाने आपले मृत्यूपत्र बनवून त्यात नमूद करावे की जेव्हा त्याच्या अंतसमय येईल, तेव्हा त्यास घरीच शांतीपूर्वक शरीर सोडू दिले जावे व त्यावेळी डॉक्टरांनी त्यास त्रास देऊ नये. मी ज्यूडिथला म्हणालो की प्रत्येक मनुष्याची आपआपली इच्छा असते, कोणासही मृत्यूपत्र बनविण्यास जबरदस्ती करणे योग्य नाही. यात सत्संगी वा बेसत्संगी असल्याचा काही फरक पडत नाही.

मला माहित आहे की उपचार पद्धतींमध्ये डॉक्टरांनी खूप प्रगती केलेली आहे आणि उपचारांसाठी त्यांच्याकडे आधुनिक साधने व यंत्रे देखील उपलब्ध आहेत. बऱ्याच प्रेमींची इच्छा देखील असते की त्यांच्या शेवटच्या श्वासापर्यंत त्यांची चिकित्सा घेतली जावी व त्यांचा मृत्यूपासून कोणत्याही पध्दतीने बचाव केला जावा. ज्या व्यक्तीची अशी इच्छा असेल त्याची चिकित्सा घेतली जावी, त्याच्या इच्छेनुसार त्यावर औषधोपचार चालू ठेवावेत. परंतु जर कोणी अशी इच्छा करीत असेल की त्यावर उपचार वगैरे न करता त्यास अंतसमयी घरी शांतीपूर्वक शरीर सोडून द्यावे तर तसेच करावे. माझ्या विचारानुसार प्रत्येक व्यक्तीच्या इच्छेनुसारच होऊ द्यावे.

तुम्ही स्वतः डॉक्टर आहात तसेच या ग्रुपमध्ये इतर डॉक्टर व चांगले सुशिक्षित लोक बसलेले आहेत. सर्वांना कल्पना आहे की डॉक्टरी क्षेत्रात खूप प्रगती झालेली आहे. उपचार म्हणून गरजवंतास कृत्रीम हृदयरोपण तसेच एखाद्या व्यक्तीला दुसऱ्या व्यक्तीचे डोळे देखील लावले जातात. पूर्वीच्या काळी, माझ्या पाहण्यात देखील आले आहे की जर एखाद्यास साधा मुतखडा देखील झाल्यास, तो ऑपरेशन करून काढण्यासाठी कोणताही उपाय नव्हता. त्यास केवळ औषधच दिले जात असे. अशा वेळी लघवीस न झाल्याने अनेक दिवस आजारी मनुष्य वेदना सहन करीत राही. ॲपेंडीक्स तसेच इतर अनेक शरीराअंतर्गत आजार आहेत, ज्यांच्यावर ऑपरेशनशिवाय इतर काहीच उपाय नसतो, परंतु आजकाल डॉक्टरी उपचार पद्धतींमधील प्रगतीमुळे रुग्णांना तात्काळ उपचारांच्या अनेक सवलती व सुगमता उपलब्ध केलेल्या आहेत.

तुमचा प्रश्न अंतसमयासंबंधी आहे की जर एखाद्या आजारी व्यक्तीची अशी इच्छा असेल की अंतसमयी कोणताही उपचार करून त्यास त्रास दिला जाऊ नये, तर त्यावर उपचार करावेत का? या संदर्भात अनेकदा असे पाहिले गेले आहे की मोठ्मोठे नेते अंतसमयी डॉक्टरांच्या कृत्रीम श्वासोच्छ्वासाच्या यंत्राच्या सहाय्याने काही काळ श्वास जरूर घेत रहातात, परंतु ते चालून-फिरून कोणत्याही कार्यक्रमात भाग घेऊ शकत नाहीत आणि काही दिवसांनी डॉक्टरांना घोषणा करावी लागते की यांची श्वासांची गती थांबली. अशा स्थितीत त्या रुग्णाची व त्याच्या वारसांची इच्छा जाणून घेणे अतिशय गरजेचे असते. कबीर साहेब म्हणतातः

वैद्य कहे हों ही भला दारू मेरे वस, ऐह ते वस्तु गोपाल की जब भावे ले खस।

आजारपणावर औषध असते परंतु मृत्यूवर कोणतेही औषध उपलब्ध नसते. गुरु नानक देवजी म्हणतातः

नर घाले सब दिवस, घटन वधन तिल सार ।
जीवन लोड़े भरम मोह, ते नानक त्यों गवार ।।

परमेश्वराने आपल्या शरीरात मोजकेच श्वास ठेवलेले आहेत. ते कमीही होऊ शकत नाहीत व वाढूही शकत नाहीत. मृत्यूसमयी आपण सर्व प्रकारचे उपचार करतो, कारण या जगावर आपला मोह असतो. रोग्याच्या मनात भ्रम असतो की कदाचित या उपचाराने माझा जीव वाचू शकेल.

महाराज सावन सिंहजी या जगाच्या इतिहासाबद्दल सांगत असत की शाह सिकंदरने ज्योतिषांना विचारले की, ''माझा मृत्यू कधी होईल?'' ज्योतिषांनी उत्तर दिले, ''हे बघा बादशहा सलामत! आकाश जेव्हा सोन्याचे व धरती लोखंडाची होईल, तेव्हाच तुमचा मृत्यू होईल.'' यावर शाह सिकंदरने विचार केला, आकाश सोन्याचे व धरती लोखंडाची होणे कधीच शक्य नाही. मी नक्कीच कोणीतरी अवतारी पुरूष आहे. त्यामुळे मला कोण हरवू शकणार? या भ्रमात तो विजयाची दवंडी पिटवित सर्वत्र हल्ला करीत, युद्ध करीत राहिला की मी या जगात स्वत:स विश्वविजेता सिद्ध करेन.

जेव्हा शाह सिकंदरने हिंदुस्थानावर हल्ला केला व सर्व काही लूटून तो परतीच्या मार्गावर चालला असताना, शीशतान येथे डास चावल्याने त्यास मलेरियाचा भयंकर ताप चढला. सिकंदर आपल्या वजीरास म्हणाला, ''आता मला यापुढे प्रवास करता येणे अवघड आहे. मला घोड्यावरून खाली उतरवावे व डॉक्टरास बोलावून घ्यावे.'' त्याकाळी योद्धे युद्धात तलवारीच्या वारांनी जखमी होऊ नये म्हणून लोखंडी चिलखताचा वापर करीत असत. राजे महाराजे सोन्याच्या ढाली वापरीत असत. वजीराने स्वतःचे चिलखत जमीनीवर अंथरले व सिकंदर राजास सावली मिळावी म्हणून राजाची सोन्याची ढाल त्याच्या तोंडावर धरली.

आपणांस कल्पना आहे की जेव्हा मनुष्याचा मृत्यु होणार असतो, तेव्हा त्याच्या हृदयात जाणीव होऊ लागते की आपला मृत्यूसमय आलेला आहे. शाह सिकंदरला हृदयातून जाणवले की आकाश सोन्याचे झालेले असून, मी पहुडलेली धरती देखील लोखंडाची झालेली आहे.

तो डॉक्टरांना म्हणाला,''माझी अंतिम इच्छा आहे की मी माझ्या आईस भेटावे. त्यासाठी जर तुम्ही मला मदत केलीत, तर मी तुम्हांस तुम्ही मागाल तेवढे धन देईन.'' परंतु सिकंदरची शारिरीक अवस्था पाहून डॉक्टर म्हणाले की,''या अवस्थेमध्ये आम्ही काहीच करू शकत नाही.'' त्यावर सिकंदर म्हणाला,''हवे असल्यास मी तुम्हांस माझे सर्व राज्य देण्यास तयार आहे. मी माझा उदरनिर्वाह भिक्षा मागून करीन, परंतु माझ्या आईशी मी बोलू शकेन अशी व्यवस्था करावी.'' त्यावर डॉक्टर म्हणाले ''बादशहा सलामतजी! आम्ही तुमचा एकही श्वास वाढवू शकत नाही.''

स्वतःस जगज्जेता समजणारा शाह सिकंदर त्यावेळी हंबरडा फोडून रडू लागला की जर मला माहित असते की श्वास एवढे मौल्यवान आहेत व कोणताही डॉक्टर श्वास वाढवू शकत नाही यागोष्टीची मला पूर्व कल्पना असती तर मी आयुष्यभर परमेश्वराचे स्मरण व ध्यान का केले नसते?

महाराज सावन सिंहजींचा एक नामधारी प्रेमी होता. त्याची अंतिम वेळ समीप आली असता त्याच्या कुटुंबातील लोकांनी डॉक्टरांना बोलावले. डॉक्टर म्हणाले,''यांना ब्रँडी (मद्य) व अंड्याचा आहार दिल्यास यांची प्रकृती सुधारू शकेल.'' हे सर्व सेवन करण्याची त्या प्रेमीची इच्छा नव्हती, परंतु घरातील माणसे त्यांना म्हणाली की,''तुम्हाला असे करण्यास काय हरकत आहे? तुम्हाला अंडी व ब्रँडीचे सेवन करावेच लागेल.'' त्यांनी त्या प्रेमीच्या तोंडात बळजबरीने मद्य व अंडी कोंबली. त्यावेळी त्या सत्संगीचे ध्यान अंतर्यात केंद्रीत झालेले होते व महाराज सावन सिंहजी प्रगट झालेले होते.

महाराज सावन सिंहजी त्या सत्संगीस म्हणाले,''हे बघ प्रिय शिष्या! अजून चार दिवस तुला तळमळत पडावे लागेल, जेणे करून तुझ्यावर झालेला त्या अंडी व ब्रँडीचा प्रभाव नाहीसा होईल. त्याने आपले नेत्र उघडले व त्याच्या पत्नीस म्हणाला, ''मला नेण्यासाठी महाराजजी आले होते, परंतु ते नाराज होऊन परत गेले आहेत, तसेच त्यांनी चार दिवसांनी येण्याचे मला वचन दिले आहे. तू सत्संगी आहेस, माझी अर्धांगीनी, माझी पत्नी आहेस; तू माझी खूप सेवा केली आहेस. आता माझ्या अंतिमवेळी ही एक सेवा कर की तू दरवाजामध्ये जाऊन बस व जोपर्यंत मी माझा अंतिम श्वास सोडत नाही, तोपर्यंत कोणासही आत येऊ देऊ नकोस.''ही सावनजींच्या जीवनकाळात घडलेली घटना आहे.

महाराज सावन सिंहजी सांगत असत, ''प्रियजनहो! जेव्हा एखाद्याचा अंतसमय समीप येतो, तेव्हा त्यास ना कोणते औषध परिणामकारक ठरते व ना मांस-अंड्यांचा आहार उपयुक्त ठरतो. जर एखाद्याची शांतपणे शरीर सोडण्याची इच्छा असेल, तर ती परमात्म्याची इच्छा मानून तसे होऊ द्यावे.''

काही महिन्यापूर्वी मला खूप ताप आला, उलट्या देखील झाल्या. त्यामुळे ताप माझ्या मेंदूपर्यंत पोहचला व मी खूप अशक्त झालो. खरेतर डॉक्टरने यावे अशी माझी इच्छा नव्हती, परंतु माझी मुलगी व जावई दोघेही घाबरून गेले व त्यांनी डॉक्टरला बोलावले. तो डॉक्टर आणखी एका डॉक्टरला

सोबत घेऊन आला, जो पहिल्या डॉक्टरपेक्षा जास्त अनुभवी होता. त्या डॉक्टरने आल्या आल्याच सांगितले की माझ्या डाव्या बाजूस न्युमोनिया झालेला आहे. मी त्यास प्रेमाने म्हणालो की,''मला न्युमोनिया झालेला नसून माझी शरीर यंत्रणा चांगल्यारितीने काम करत आहे.'' त्यावर तो मोठ्या रूबाबात म्हणाला,''तुम्ही स्वतःच्याच मर्जीनुसार इलाज करणार असाल तर मला येथे बोलावण्याची काय गरज होती?''

माझे जे देखभाल करणारे होते, त्यांच्यासाठी म्हणून मी शांत राहिलो. तो डॉक्टर म्हणाला,''यांना आताच्या-आता रायसिंगनगर येथे घेऊन चलावे. मी पहाटे चार वाजेपर्यंत यांचे एक्सरे वगैरे सर्व तपासण्या करतो. परंतु आणखीन उशीर केल्यास व काही घडल्यास मला तुम्ही दोष देऊ नका.''

तीव्र तापामुळे मला गुंगी आलेली होती. त्यामुळे मला रायसिंगनगर येथे नेण्यात आले व ते डॉक्टर माझी ३-४ तास तपासणी करीत राहिले. दुसरा डॉक्टर म्हणाला, यांना न्युमोनिया नसून हे हृदयरोगी असल्याने त्यांचा रक्तदाब वाढला आहे. माझ्या शरीरास बरीच यंत्रे जोडलेली होती. त्यांनी आणखीन बरेच काही मला सांगितले. मला यापैकी कोणताही आजार नाही असे मी नाईलाजाने डोके हलवून ईशाऱ्याने सांगत होतो. परंतु कोणीही माझे म्हणणे ऐकले नाही. डॉक्टरने वेळोवेळी मला देण्यासाठी गुरुमेलला अनेक प्रकारची औषधे दिली. ती औषधे घेऊन आम्ही घरी आलो. मी अनेक प्रकारे यांना सांगितले की,''प्रिय बंधूंनो! डॉक्टरने सांगितलेल्या आजारांपैकी कोणताही आजार मला नाही. तुम्ही एवढा खर्च करून जरी ही औषधे आणली असतील, तरी ती औषधे मला देऊ नका.'' परंतु तरीही माझे कोणीच ऐकले नाही. मला त्या औषधांचा एक डोस दिला. मी अगोदर इतरांशी बोलत होतो. परंतु तो डोस घेतल्यावर मी एकदम बेशुद्ध पडलो; पंधरा मिनिटे तर मी कोठे आहे याची मला शुद्ध देखील राहिली नाही. माझ्या मुलीचे डोके माझ्या छातीवर होते. गुरुमेल व त्याचे वडील रडत होते. सर्वांचेच काळीज फाटले होते.

मी शुद्धीत आल्यावर त्यांना म्हणालो, ''तुम्हास मी काय सांगितले होते? तुम्ही अजुनही मला औषधे देऊ नका. माझी तब्येत बरी असून मला फक्त ताप आहे, ग्लानी आपोआप उतरेल.'' त्यानंतर डॉक्टरने दिलेली सर्व औषधे गुरुमेलने शौचालयात टाकून दिली. ज्या डॉक्टरने माझी विविध यंत्रांनी तपासणी करून मला न्युमोनिया नसून हृदयविकार आहे असे सांगितले होते, त्या डॉक्टरने दुसऱ्या एका डॉक्टरशी पैज लावली होती की यांना हा आजार नसल्यास मी डॉक्टरकीचा व्यवसाय सोडून देईन. पप्पूस देखील कल्पना आहे की अनेक दिवस मी औषध घेतले नाही.

सरतेशेवटी एक विशेष प्रसिद्ध नसलेल्या साध्या डॉक्टरने येऊन सर्वांना विनंती केली की मला संतांची सेवा करण्याची थोडीशी संधी द्यावी. कदाचित मी केवळ निमीत्त ठरून संतांची तब्येत ठिक होईल. त्याने एखाद्या लहान मुलास द्यावे तेवढे स्वल्प व सौम्य औषध मला दिले, ज्यामुळे मी खूप दिवसांनी बरा झालो. मी माझ्या मुलीस व जावयास अतिशय प्रेमाने म्हणालो (याचे त्यांच्याकडे रेकॉर्डींग देखील आहे) माझी कधीही अशी अवस्था झाल्यास, मी बेशुद्ध पडल्यास, मला कधीही इस्पितळामध्ये नेऊ नका. मला आरामात माझ्या खाटेवर पडून राहू द्यावे.''

मी प्रश्नकर्त्यास केवळ हेच म्हणेन की तुम्ही केलेत ते चांगले केलेत की पित्याच्या इच्छेनुसार त्यास शांतपणे शरीर सोडू दिलेत. प्रियजनहो, मी हे सुद्धा मानतो की एखाद्या व्यक्तीस त्याच्या इच्छेनुसार शरीर सोडू दिल्यास ती सुद्धा एक प्रकारची सेवाच असते.

एक प्रेमी : ज्याप्रमाणे प्रत्येक जन्मात आत्मा तोच राहतो व त्याच्या कर्मांना अनुसरून केवळ शरीर बदलत रहाते, त्याप्रमाणे काय मनुष्याचे मन देखील तेच राहते की कर्मांना अनुसरून मनामध्ये देखील पूर्णपणे अथवा काही प्रमाणात बदल घडतो?

बाबाजी : बंधूंनो! याबद्दलची खरी माहिती व याचे ठोस उत्तर आपण ध्यान–अभ्यास करून अंतर्यात गेल्यानंतरच आपणांस मिळू शकते, कारण

सत्य अंतर्यात आहे. तरीही महात्म्यांनी बाह्यजगातील काही उदाहरणांद्वारे ही माहिती अनेक पद्धतींनी समजावून सांगितली आहे.

ज्याप्रमाणे लोखंडास गरम करण्यासाठी भट्टीत कोळसे पेटवून त्यातील अग्नीमध्ये त्यास टाकले जाते. जरी ते लोखंड पेट घेत नसले, तरीही ते तत्प होते, अग्नीप्रमाणेच लाल होते. त्याचप्रमाणे ज्या (शरीररुपी) सापळ्यात आपला आत्मा व आपले मन रहात असतात, त्याचा त्यांवर परिणाम होतो. आपल्या पूर्व जन्मांमधील चांगल्या व वाईट कर्मांना अनुसरुनच मनाची घडण होते आणि त्याला अनुसरुनच आपल्या आत्म्यावर चांगला वा वाईट परिणाम होतो. गुरु नानक देवजी महाराज म्हणतातः

ऐह मन कर्मा ऐह मन भरमा, ऐह मन पंच तत से जन्मा ।

याचे वर्णन कबीर साहेब पुढील प्रमाणे करतातः

ऐह मन शक्ति ऐह मन सीयो, ऐह मन पंच तत का जीयो ।

आपला आत्मा सतपुरुषाचा अंश आहे व मन काळाचा प्रतिनीधी, काळाच्या शक्तीचे रूप आहे. आता तुम्हीच निर्णय घ्या की दोघेही एकसमान कसे बरे होतील? जास्तकरून मनावर आपल्या पूर्वकर्मांचा प्रभाव असतो.

महाराज कृपाल सांगत असत, ''मनासमान दुसरा कोणताच शत्रू नाही. परंतु जर त्याची समजूत घालून त्याच्या मूळ जन्मस्थानी म्हणजेच ब्रम्हस्थानात पोहोचविल्यास त्याच्यासारखा दुसरा एकनिष्ठ मित्र देखील नाही.''

महाराज सावन सिंहजी सांगत असत, ''सत्संगी व्यक्तीस सतगुरुंनी सत्संगात समजावलेल्या गोष्टींचा व्यर्थ कीस काढत (त्यावर कथ्याकूट करीत) आयुष्य गमावू नये की हे असेच का, ते तसेच का?'' सर्वात अगोदर आपण आपल्या आत्म्याची ओळख करून घ्यावयास हवी. आपण जेव्हा ध्यानअभ्यास करीत करीत आपल्या मनावरील स्थूल, सूक्ष्म आणि कारण हे तीनही पडदे दूर करतो, तेव्हा मन खालच्या पातळीवर राहते. त्यावेळी आपण स्वतःच्या नजरेने त्रिकुटी वा ब्रम्हस्थानात जाऊन पाहू शकतो की आपले मन कोणत्या मसाल्याने बनलेले आहे? त्याच्यामध्ये बदल घडतो की नाही?

नेहमी सांगितले जाते की जेव्हा प्रलय येतो, तेव्हा ब्रम्ह अर्थात ॐ पर्यंत सर्व निर्मीतीचा (जीवांचा) एकदा विनाश होतो. जो त्या स्थानापर्यंत पोहोचलेला असतो, त्याचा देखील अंत होतो. महाप्रलयामध्ये भंवरगुंफेपर्यंत असलेली सर्व मंडळे नष्ट होतात. परमात्मा जेव्हा संपूर्ण विश्वाची रचना पुन्हा करतो, तेव्हा त्या स्थानांपर्यंत पोहोचलेल्या आत्म्यांना पुन्हा या संसारात यावे लागते.

सचखंड हा असा एकच देश आहे, जेथे प्रलय किंवा महाप्रलय पोहोचू शकत नाही. त्यामुळे तेथे पोहोचलेला कोणताही आत्मा या संसारात पुन्हा येत नाही. केवळ तेच आत्मे परत संसारात येतात ज्यांना परमात्मा इशारा करून सांगतो की तुम्ही या जगात जाऊन काळाच्या जाळ्यात अडकलेल्या आत्म्यांना परत घेऊन या. असे आत्मा ज्यामार्गाने सचखंडामध्ये पोहोचलेले असतात, त्याच मार्गाने या जगात परत येऊन या काळाच्या मंडळातील जीवांना संदेश देतात की, ''प्रिय आत्मांनो, हा तुमचा देश नाही, हे तुमचे निजघर नाही. येथील जाती–पाती तुमच्या नाहीत. हा शरीररूपी पिंजरादेखील तुम्हांस काळानेच दिलेला आहे. चला या! आम्ही तुम्हांस तुमच्या पिता परमात्म्याकडे घेऊन जातो, जो सचखंडाचा स्वामी आहे. तुम्हास तुमच्या निजधामास (खऱ्या घरी), सचखंडात घेऊन जातो.'' आता तुम्ही स्वतःच निर्णय करा की जी गोष्ट अमर आहे (आत्मा) ती कधी नाश पावत नाही व जी ठिकाणे प्रलय किंवा महाप्रलयात उध्वस्थ होतात त्या ठिकाणच्या गोष्टी (मन) नष्ट न होता शश्वत कशा राहू शकतील?

तुम्ही विचारलेला प्रश्न अतिशय रोचक असून त्याच रोचकतेने त्याचे तुम्ही उत्तर समजून घ्यावे. कदाचित प्रश्नकर्ता डॉक्टर असावा, कारण या ग्रुपमध्ये बरेचजण डॉक्टर आहेत. डॉक्टरांनी शरीरावर बऱ्याच शस्त्रक्रिया केलेल्या असतात. जर ही अंतर्यातील गोष्ट अशा बाह्यरितीने समजावल्याने समजण्यासारखी असती, तर डॉक्टरांनी शरीरांची चिरफाड करून त्या गोष्टीचे आकलन करून घेतले असते की मन व आत्मा हे एकसमान आहेत का वेगवेगळे आहेत. नाही! या सर्व सूक्ष्म बाबी असून त्यांचे आकलन होण्यासाठी

ध्यान–अभ्यास करून अंतर्यातच जावे लागेल. जेव्हा आपण अंतर्यात जातो, तेव्हा कोणत्याही शंका कुशंका बाकी राहत नाहीत, तेथील मार्ग अगदी एखाद्या पुस्तकाप्रमाणे उघडला जातो.

प्रियजनहो! आपल्या या जगातील तंत्रज्ञानी लोकांनी टेलिव्हिजन व रेडिओ बनविले आणि त्यात कलाकारांचे विविध कार्यक्रम प्रायोजित केले. जर का त्या तंत्रज्ञानींना असा प्रश्न विचारला की त्या टेलिव्हिजनमध्ये वा रेडिओमध्ये दिसणारे व बोलणारे स्त्री–पुरुष व पाश्वसंगीत एकाच प्रकारचे आहेत का वेगवेगळे आहेत? तर तुम्ही विचार करुन पहा, ते तंत्रज्ञ आपणांस कसे बरे समजावू शकतील? त्यापेक्षा स्वत: तंत्रज्ञ बनून आपणच ते तंत्र शिकून घेतलेले बरे, म्हणजे आपल्या लक्षात येईल की त्या यंत्रामध्ये चित्र दिसण्यासाठी व संगीत ऐकू येण्यासाठी कशा प्रकारे व्यवस्था केलेली आहे? कशा रितीने चित्र व संगिताचे ध्वनीमध्ये रूपांतर करून, एकाच प्रकारे बनविल्या गेलेल्या अनेक संचांमध्ये आपण ते पाहू व ऐकू शकतो. त्या संचांमधील उपकरणांमध्ये वारंवार बदल केला जात नाही. हे सर्व तंत्र एकच असून, आपणांस त्याचे केवळ आकलन होणे गरजेचे आहे.

आपल्यासारखे जे लोक ज्यांना या गोष्टींची जाण नसते, ते वारंवार आश्चर्यचकित होतात. या बाबतीचे जाणकार व्यक्ती आश्चर्यचकित होत नाहीत किंवा त्यांच्या मनात असे प्रश्न उभे रहात नाहीत. त्याचप्रमाणे जर आपणांस परमात्म्याच्या या संरचनेचे ज्ञान प्राप्त करून घ्यावयाचे असल्यास व त्या अंतर्यातील तंत्रज्ञास समजून घ्यायचे असल्यास, आपणांस ध्यान अभ्यास करून अंतर्यात जाऊन त्यास भेटावे लागेल. त्याने सांगितल्याप्रमाणे आपण केले तर त्याच्या सर्व रहस्यांचा आपोआपच आपणांस उलगडा होईल की कशारितीने मनात बदल होतो व कशारितीने आत्मा कायम राहतो.

मी अपेक्षा करतो की जेवढा हा प्रश्न उत्सुकता निर्माण करणारा आहे, तेवढ्या उत्सुकतेने, प्रेमाने आपण ध्यान–अभ्यास करून अंतर्यात जाण्यासाठी उत्साह निर्माण करावा.



प्रियजनहो! एक अतिशय रोचक तसेच विनोदी गोष्ट आहे. पूर्वी माझ्याकडे एक रूपराम नामक मनुष्य राहत असे. साधारणपणे पंचवीस वर्षांपूर्वी त्यास योगायोगाने दिल्लीस जाण्याची संधी मिळाली. राजस्थानमध्ये रस्ते बनून, बसेसची रहदारी अलिकडेच सुरू झाली आहे व फॅशनचा प्रचारदेखील हळ्हीहळ्हीच थोडाफार होऊ लागला आहे. पूर्वी इथले बहुतांश लोक साधेसुधे होते.

दिल्लीस गेल्यावर रूपरामने एक स्त्री पाहिली. त्याकाळी दिल्लीत स्त्रिया मोठमोठे केसांचे आंबाडे घालून शृंगार करीत असत. त्याने जेव्हा केसांचा आंबाडा घातेलेली स्त्री पाहिली, तेव्हा त्यास वाटले, कदाचित ही स्त्री दोन डोक्यांची आहे. त्याचवेळी त्याने दुमजली (डबलडेकर) बस पाहिली. ती बस पाहून त्यास वाटले, एक बसवर दुसरी बस ठेवलेली आहे. त्याने राजस्थानमध्ये तर एकही बस पाहिलेली नव्हती. तो ज्या व्यक्तीसोबत दिल्लीस गेला होता, तो मजा–मस्करी करण्यात पारांगत होता. त्याने देखील रूपरामला मुद्दाम काही समजावून सांगितले नाही.

रूपराम घरी परतल्यावर मी त्यास विचारले, ''रूपराम तू दिल्लीस जाऊन आलास, तेथे काय काय पाहिलेस?'' तो म्हणाला,''एका स्त्रीची दोन डोकी, तर एका बसवर दुसरी बस.'' मी त्यास म्हणालो, ''हे बघ! तू मला सांगितलेस ठिक आहे, परंतु ते इतर कोणाजवळही बोलू नकोस.'' परंतु जेव्हा मनुष्य एखादी नवीन गोष्ट पाहतो, तेव्हा त्याला वाटते की ती गोष्ट आपण इतरांना सांगावी. त्याच्या गावातील लोकांनी विचारले,''रूपराम तू दिल्लीस जाऊन आलास, तेथे काय काय पाहिलेस?''त्याने उत्तर दिले,''एका बसवर दुसरी बस व एका स्त्रीची दोन डोकी.'' त्याच्या या सांगण्यावर कोणीच विश्वास ठेवला नाही. सर्वजण त्यास खोटारडा मानू लागले.

तो बेचैन होऊन माझ्याकडे आला. मी त्यास सांगितले,''तू त्यांना सांग, मी तुमचा गाडीभाड्याचा खर्च करतो, तुम्ही स्वतः माझ्यासोबत येऊन ते पहा, जेणेकरून तुमचा त्यावर विश्वास बसेल.'' परंतु कोणीही सोबत जाण्यास तयार नव्हता व त्याच्या सांगण्यावर विश्वास ठेवण्यासही कोणी तयार नव्हता.

प्रियजनहो! संतांची गोष्ट सुद्धा ह्याच तऱ्हेची असते. संत या जगात येऊन आपणांस आपल्या स्वदेशाची म्हणजेच सचखंडाची माहिती देतात, जिथले आपण मूळ वासी आहोत. परंतु आपण तेथे जाऊन स्वत:ची खात्री करून घेण्यास तयार नसतो. रूपरामप्रमाणे संत येथे येऊन आपणांस अनेक उदाहरणे देऊन खूप समजावण्याचा प्रयत्न करतात की, ''प्रियजनहो, तुम्ही माझ्या सोबत चला व पहा!'' परंतु आपण त्यांच्या सोबत जाण्यास तयार नसतो. संत दयाळू असतात, आपण विचारलेल्या कोणत्याही प्रश्नाने ते नाराज होत नाहीत.

माझ्या प्रांतातील दोन–तीन सत्संगी बाबा सावन सिंहजींकडे नामदान प्राप्त करण्यासाठी गेले. त्यातील एकाचे नाव लूणाराम होते. पंजाबला पोहोचल्यावर त्यांची एका सत्संगीशी गाठ पडली. त्याने त्यांस सांगितले, तुम्हांस परमेश्वरास पहावयाचा असेल तर तुम्ही सिकंदरपुर येथे महाराज सावन सिंहजींकडे जा. महाराज सावन सिंहजी रहात असलेल्या प्रांतात ऊसाचे पीक खूप मोठ्या प्रमाणात येत असे. ती वयोवृद्ध माणसे सरळसाधी होती. ते महाराज सावन सिंहजींकडे गेले असता, महाराज घरातच होते. ती माणसे महाराजजींना म्हणाली,''सरदारजी! आम्ही परमेश्वरास पाहण्यासाठी आलो आहोत.'' महाराज सावन सिंहजी हसले, कारण त्यांना आम्हा राजस्थानी लोकांच्या साधेपणाची कल्पना होती. ते म्हणाले, ''काही हरकत नाही चौधरींनो! तुम्हांस परमेश्वर नंतर दाखवीन. तुम्ही अगोदर ऊसाचा रस प्या. तुमच्या प्रांतात ऊसाचे पीक येत नसल्याने तुम्हास रस प्यावयास मिळत नसेल.'' त्यांनी सेवादारांना सांगितले,''चौधरींना मनसोक्त रस पाजावा.''

त्याकाळी आमच्या राजस्थान प्रांतात दुष्काळ पडत असे, पाण्याचे खूप दुर्भिक्ष असे. त्यामुळे कोणीही इतरांना एखादी वस्तू एवढ्या मोठ्या हृदयाने देऊ शकत नव्हते. महाराज सावन सिंहजींच्या बोलण्याचा त्या चौधरींवर अत्यंत चांगला प्रभाव पडला की सरदारजी खूप विशाल हृदयाचे आहेत. त्यांनी मोकळ्या हृदयाने रस पिण्याची परवानगी दिली असल्याने आपण मनसोक्त

रस प्यावा असा विचार त्यांनी केला. सेवादारांनी त्यांना शेतात नेऊन खूप रस पिण्यास दिला. एक-दोन तासानंतर महाराज सावन सिंहजी तेथे गेले व त्यांना विचारले,''चौधरींना रस पाजला काय?'' त्या चौधरींनी लगेच उत्तर दिले,''आम्ही भरपूर रस प्यायलो आहोत. तुमच्यासारखे विशाल-हृदयी आम्ही आजपर्यंत कोणीच पाहिलेले नाही. आता तुम्ही आम्हांस परमेश्वर देखील दाखवावा.'' महाराज सावन सिंहजी म्हणाले, ''काही हरकत नाही, तुम्हास आताच परमेश्वर दाखवितो.'' त्यांना तेथे शेतामध्येच बसवून संतमताची माहिती दिली, नामदान दिले व त्यांना ध्यान-अभ्यासासाठी बसविले. त्यांना महाराज सावन सिंहजी समजावून सांगू लागले,''हे बघा! संत स्वत: परमेश्वर नसतात. परंतु परमेश्वरास प्राप्त करण्याची युक्ती मात्र त्यांच्याकडे असते. तुम्ही याप्रमाणे दररोज ध्यान-अभ्यास करीत अंतर्यामध्ये गेल्यास, तुम्हास सत्याचे ज्ञान होईल, परमेश्वराचे दर्शन कराल.''

त्या लुणारामास शरीर सोडून थोडे दिवस झाले आहेत. बराच वयोवृद्ध झाल्यानंतर त्याने शरीर सोडले. तो सांगत असे की महाराज सावन सिंहजी कशात्र्हेने आम्हा साध्या-भोळ्या लोकांचे बोलणे ऐकल्यावर नाराज न होता, आम्हांस त्यांनी नामदान दिले.

एक प्रेमी : माझा अंतर्यात जाण्याविषयीचा प्रश्न आहे. अंतर्यात जाण्यासाठी सेवकाने काय करावयास हवे? सेवकाने अंतर्यात जाण्यास सुरुवात केली आहे हे त्यास कसे कळते?

बाबाजी : हो बंधुंनो! सर्वप्रथम सेवकास गुरुंवर प्रेम व गुरुंवर विश्वास असणे गरजेचे आहे. जर या दोन्ही गोष्टी असतील, तर मेहनत करण्यासाठी हवा असलेला उत्साह आपोआपच निर्माण होतो. सतगुरुंची कृपा व सेवकाची मेहनत या दोन्ही गोष्टी सोबतच चालत असतात. सेवक जर मेहनती असल्यास, आपण ज्या सतगुरुंची चाकरी करीत आहोत, ते सतगुरु अन्यायी नाहीत, ते जरुर कृपेचा वर्षाव करतात. परंतु आपण जर मेहनतीचे चोर (आळशी) असलो, तर सतगुरु तरी काय करतील?

आपण येथे बसून सर्वांचे चेहरे पहात आहोत की कोणाचे डोके झाकलेले आहे तर कोण बोडका आहे? कोणाचे केस लहान तर कोणाचे केस मोठे आहेत? कोणाच्या डोळ्यांवर चष्मा आहे व कोणाच्या नाही? प्रियजनहो, आपण अंतर्यात यापेक्षाही स्पष्टपणे पाहू शकतो. आपण जर ध्यान-अभ्यास करून अंतर्यात गेलो, तर आपण स्वत:च्या डोळ्यांनी सर्व काही पाहू, तसेच ते पाहिल्याची साक्षही आपण सतगुरुंपुढे देऊ व म्हणू की तुम्ही आम्हावर केलेल्या कृपेची परतफेड आम्ही करू शकत नाही.

तुमचे अनेक बंधू राजस्थान ग्रुपमध्ये येऊन ध्यान-अभ्यास करतात, त्यांपैकी जरूर काहीजण अंतर्यातील दृश्यांचे वर्णन करून सांगतात व सतगुरुंनी त्यांच्यावर केलेल्या कृपेबद्दल ते आभार देखील मानतात. जे सेवक आळस करतात, आजचे काम उद्यावर ढकलतात, त्यांच्यावर सतगुरु प्रसन्न होत नाहीत. सेवकाच्या अंतर्यातील प्रगतीच्या संथगतीवर सतगुरु आनंदी नसतात. सतगुरुंची इच्छा असते की त्यांच्या जीवनकाळातच सर्व शिष्यांच्या अंतर्यात शब्द-धार प्रगट व्हावी. ज्या शिक्षकांचे अधिकाधिक विद्यार्थी उत्तीर्ण होतात, तेच स्वत:स शिक्षक म्हणविण्याचे हकदार असतात. त्याचप्रमाणे संत-सतगुरुंची देखील इच्छा असते की त्यांच्या जीवनकाळातच त्यांचे अधिकाधिक शिष्य



परमार्थात यशस्वी व्हावेत, शिष्यांनी स्वतःच्या अंतर्यात शब्द–धार प्रगट करावी व सतगुरुंनी शरीर त्यागल्यानंतर शिष्य इतरत्र भटकू नयेत.

एक प्रेमी : आम्हांस अनेकदा आपल्या अशा नातेवाईकांना वा मित्रांना भेटण्याची वेळ येते, ज्यांच्या नातेवाईकांचा मृत्यू झालेला असतो अथवा मृत्यू होत असतो. अशा दुःखी लोकांना (सांत्वनहार्य) आम्ही काय सांगावे?

बाबाजी : तुम्ही दररोज सत्संगामध्ये ऐकता की या जगात मोठ्मोठे वल्ली, पैगंबर आले, ते सुद्धा याजगात स्थिरावू (सदैव जीवीत राहू) शकले नाहीत. प्रत्येकजण कधी ना कधी हे जग सोडून जाणार आहे. ज्या परमात्म्यासमोर आपला जोर चालत नाही, त्याचा हुकूम मानण्यातच (मर्जीनुसार चालण्यातच) आपले हित आहे. हा देश जन्म–मरणाचा देश आहे. अनेकजण आम्हास सोडून जाणार आहेत, तर अनेकांना आपण सोडून जाणार आहोत.

मार्कंडेय ऋषींनी जास्तीत जास्त वर्षांची आयु उपभोगली, परंतु अखेरीस ते देखील हा संसार सोडून गेले. रावणांस लाखो नातवंडे व पुत्र होते, त्याने देखील दिर्घायुष्य उपभोगले, परंतु अखेरीस तो देखील हे जग सोडून गेला. त्रेतायुगामध्ये रामचंद्र महाराज आले, ज्यांनी दहा हजार वर्षे आयुष्य उपभोगले, उत्तम राज्यकारभार केला. परंतु शेवटी त्यांना देखील एके दिवशी हे जग त्यागावे लागले. गुरु नानक देवजी महाराजांनी आपणांस धीर धरण्याविषयी व परमात्म्याची मर्जी मानण्याविषयी फार छान सांगितले आहे कीः

राम गयो रावण गयो जांको बोह परिवार ।
कहो नानक थिर कुछ नहीं सुपने ज्यों संसार।।

आपण जर त्या मित्रांचे म्हणणे ऐकले नाही तर त्यांना वाईट वाटेल. परंतु आपण जर त्यांच्यासोबत रूदन केले तर आपण त्यांचे दुःख वाढविण्यास कारणीभूत ठरू. आपण त्यांना प्रेमाने समजावणे गरजेचे असते की त्यांनी धीर धरावा व अशा घटनेस परमात्म्याची मर्जी मानावी. ***

धन्य अजायब

दिल्ली शहरातील सत्संगाचा कार्यक्रम – १६ ते १८ मे २०१४ – कम्युनिटी हॉल, भेरा एन्क्लेव, पश्चिम विहार (पीरागडी चौक जवळ) नवी दिल्ली – ११० ०८७